संशोधन आराखडा

“करवीर संस्थानातील कर्तबगार स्त्रियांचा इतिहास सन १८१८ ते १९५०”

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्‌यापीठ, नांदेड, अंतर्गत

मानव्यविद्‌याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवी साठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक
नरेंद्र नरसिंग सूर्यवंशी (एम.ए. नेट, सेट)
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
विठ्ठलराव पाटील महाविद्‌यालय कळे,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

मार्गदर्शक
डॉ.शहाजहान बशीर शेख (एम.ए., एम.फिल.,पीएच.डी., सेट)
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
आझाद महाविद्‌यालय, औसा,
ता.औसा, जि.लातूर

संशोधन केंद्र,
नूतन महाविद्‌यालय, सेलू,
ता.सेलू, जि.परभणी

मार्च २०२२

प्रस्तावना:

स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाह विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आला. या प्रवाहाने भारतीय इतिहास लेखनाची चिकित्सा सुरु केली. स्त्रियांच्या इतिहासातील योगदानाविषयी चर्चा होऊ लागली. स्त्रियांच्या योगदानाबाबत इतिहास लेखनात खूप कमी उल्लेख झालेले आढळतात. त्यामुळे या प्रवाहाने स्त्रियांच्या इतिहासातील योगदानाला अग्रस्थान दिले. इतिहासातील दुर्लक्षित स्त्रियांचे कार्य नव्याने प्रकाशात आणले. करवीर संस्थान राजर्षी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाने प्रकाशमान आहे. या संस्थानात अनेक सामाजिक चळवळी निर्माण झाल्या. वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या अगोदर आणि त्यांच्या प्रेरणेने नंतरही या चळवळीनी अनेक सुधारणा केल्या. इतिहासातील अनेक स्त्रिया देखील या संस्थानात आपल्या कर्तृत्वाने अजरामर झाल्या. वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये या स्त्रीयांनी आपल्या कार्याचा ठसा करवीर संस्थांनच्या इतिहासात उमटविला आहे.

या स्त्रियांमध्ये इंदूमती सरकार यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केल्याचे दिसून येते. तसेच जनाक्का शिंदे यांचे कार्य तर अपितु महाराष्ट्र पसरले आहे. करवीर संस्थाना मध्ये ही त्यांच्या कार्याचा मोठा विस्तार होता त्याच प्रमाणे त्यांच्याच प्रेरणेने पुढे झालेल्या आनंदीबाई शिर्के तत्कालिन सामाजिक परिस्थितीचे दर्शन आपल्या सांजवात या आत्मचरित्रात घडवितात. करवीर संस्थानच्या नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासातील आरोग्य क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात त्याकाळी वैद्यक शास्त्राची पदवी मिळवून डॉक्टर झालेल्या कृष्णाबाई केळवकर यांचे नाव व कर्तृत्व दुर्लक्षित करण्याजोगे नाही. त्यांच्या कार्याची नोंद घेणे इतिहासाला क्रमप्राप्त आहे. कृष्णाबाई केळवकर प्रमाणेच त्यांच्या दोन मुलींनीही आपले योगदान करवीर संस्थानच्या इतिहासात दिले आहे. तसेच पुण्याच्या पार्वती मंदिर सत्याग्रहामध्ये सहभाग दिलेल्या करवीर संस्थानाच्या शिऊबाई जाधव यांचीही योग्य ती दखल इतिहासाने घेणे

चुकीचे ठरणार नाही. करवीर संस्थाना मधील दत्तोबा पवार यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे त्याचप्रमाणे त्यांच्या सुनबाई यांचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. याचीही नोंद इतिहासात घ्यावी लागते.

करवीर संस्थान म्हणजे राजर्षी शाहूंच्या कर्तृत्वाची पुण्यनगरी होय. या संस्थांनामध्ये त्यांच्याच मार्गदर्शन व पुढाकाराने भरलेल्या सन 1920 च्या ऐतिहासिक माणगाव परिषदेच्या स्वागतगीत गायलेल्या दोन महिला या ऐतिहासिक आहेत. त्यांच्याही कार्याची नोंद इतिहासात घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे तुकाराम आप्पाजी गणेशाचार्य यांची पत्नी व कन्या यांचेही या संस्थानांमध्ये महत्त्वाचे असे कार्य दिसून येते. अस्पृश्य समाज, मराठा समाज इत्यादी सर्व समाज व विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा इतिहास, करवीर संस्थांनामधील इतिहासात त्यांचे योगदान प्रकाशात आणणे व त्यावर संशोधन होणे महत्त्वाचे आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये स्त्रियांनी आपल्या कार्याचा ठसा करवीर संस्थानाच्या इतिहासामध्ये उमटविलेला दिसून येतो. शिक्षण क्षेत्र, कायदा क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कला, त्यामध्ये नाट्य, संगीत, सिनेमा, यामध्येसुद्धा या संस्थानातील महिलांनी आपले उत्तुंग कार्य केल्याचे दिसून येते. सन 1947 च्या अगोदरच्या चळवळी तसेच दत्तक चळवळ, गोवा मुक्ती संग्राम यामध्येही या संस्थानातील महिलांनी आपले योगदान दिलेले आहे. त्याचप्रमाणे कार्पोरेट क्षेत्रातील विमलाबाई बागल यासुद्धा आपल्या कार्याचा ठसा करवीर संस्थानामध्ये उमटवलेल्या दिसून येतात. आरक्षणाच्या आधीच्या महिला तसेच राजकारणातील कर्तबगार स्त्रिया या करवीर संस्थानामध्ये दिसून येतात. म्हणून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा इतिहास करवीर संस्थानामध्ये इतिहासातील त्यांचे योगदान प्रकाशात आणणे व त्यावर संशोधन होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी संशोधनासाठी या विषयाची निवड केली आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात करवीर संस्थानामध्ये कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा त्यांच्या कार्याचा झालेला परिणामांचा अभ्यास केला जाणार आहे.

विषय निवडीचा उद्देश:

करवीर संस्थानामध्ये सन १८१८ ते १९५० या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, आरोग्य, कायदा, प्रशासन, खेळ, कला, साहित्य, नाट्य, सिनेमा इत्यादी विविध क्षेत्रातील स्त्रियांच्या कार्यावर प्रकाश टाकणे हा या विषय निवडीचा उद्देश आहे. करवीर संस्थानामधील विविध सामाजिक चळवळीत स्त्रियांचे योगदान तसेच विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे झालेला परिणाम अभ्यासणे हा या शोधप्रबंधाचा हेतू आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट:

१. करवीर संस्थांना मधील सन १८१८ ते १९५० या काळातील विविध क्षेत्रातील स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेणे.
२. करवीर संस्थांना मधील स्त्रियांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम अभ्यासणे.
३. करवीर संस्थानामध्ये सन१८१८ ते १९५० या काळातील स्त्री सुधारणे बाबत झालेल्या कायद्यांचा व त्याच्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. करवीर संस्थानामधील १८१८ ते १९५० या काळातील स्त्रियांच्या ऐतिहासिक योगदानावर प्रकाश टाकणे.
५. स्त्रीवादी इतिहास लेखनातून स्थानिक इतिहासाचे लेखन करणे.

गृहितके:

१) करवीर संस्थानामध्ये सन १८१८ ते १९५० या काळात विविध क्षेत्रात कर्तृत्वान महिला होऊन गेल्या.
२) करवीर संस्थानामधील सन १८१८ ते १९५० या काळातील स्त्रियांच्या कार्याचा समाजावर महत्वपूर्ण दूरगामी परिणाम झालेला आहे.

३) करवीर संस्थानामध्ये सन १८१८ ते १९५० या काळातील ब्रिटीश शिक्षण, सामाजिक चळवळी व सुधारणावादी कायद्यांनी सर्वसाधारण महिलांच्या कर्तृत्वाला बळ दिले.

४) करवीर संस्थानामध्ये सन १८१८ ते १९५० या काळात राजकीय क्षेत्रासह इतरही विविध क्षेत्रातील महिलांचे कार्य हे एक ऐतिहासिक योगदान आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाला वेळ, काळ, प्रदेश आणि परिस्थितीच्या मर्यादा असतात. प्रस्तुत शोध प्रबंधात करवीर संस्थानामधील सन १८१८ ते १९५० या काळातील सर्व क्षेत्रातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे सर्वच महिलांचा समावेश करणे ही या संशोधन शोधप्रबंधांची मर्यादा दिसून येते.

संशोधन पद्धती :

करवीर संस्थानातील कर्तबगार महिलांचा इतिहास सन १८१८ ते १९५० या विषयाच्या संशोधनासाठी संदर्भानुसार ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

तथ्य संकलन:

संदर्भ संशोधन पद्धती त्यामध्ये प्राथमिक साधने व दुय्यम साधने यांचा वापर या प्रस्तावित संशोधन शोध प्रबंधासाठी केला जाईल. प्राथमिक साधनांमध्ये समकालीन कागदपत्रे, वृत्तपत्रे, प्रकाशित, अप्रकाशित साधनांचा वापर केला जाणार आहे.

संशोधनाचे महत्त्व:

स्त्रीवादी इतिहास लेखनातून महिलांचे कार्य, योगदान, त्यांनी केलेल्या जात, वर्णव्यवस्था छेदक कार्यकर्तृत्वाचा आलेख इतिहासाच्या कक्षेत मांडणे गरजेचे आहे. विसाव्या शतकातील सुधारणावादी चळवळींचा इतिहास लिहिताना

त्यामध्ये सुधारणावादी स्त्रियांना स्थान देणे आवश्यक आहे. सुधारणावादी चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांना आलेले अनुभव, तत्कालीन कालखंडात प्रथा व परंपरांना झुगारून नवीन सुधारणावादी मूल्य आत्मसात करून त्यांचा प्रचार व प्रसार करणे ही प्रवाह विरोधातील स्त्रीयांची वाटचाल सामाजिक सुधारणेच्या इतिहासाच्या दृष्टीने व स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. करवीर संस्थान हे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यामुळे त्या काळातील इतर संस्थानिकांना आदर्श ठरणारे संस्थान होते. एक प्रगतीशील संस्थान म्हणून करवीर संस्थान ओळखले जात होते. करवीर संस्थाना मधील कर्तृत्वान स्त्रियांच्या कामगिरीचा आढावा घेणे तसेच त्यांच्या कार्याचा समाज मनावर झालेला परिणाम अभ्यासणे म्हणूनच आवश्यक आहे. म्हणून या विषयावरील संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधनाची आवश्यकता :

स्थानिक इतिहास प्रकाशात आणणे हा इतिहास लेखन प्रवाहातील महत्त्वाचा प्रवाह आहे. त्या अनुषंगाने करवीर संस्थानामधील कर्तृत्ववान महिलांच्या कार्यावर संशोधन होणे आवश्यक आहे. तसेच आजपर्यंत दुर्लक्षित अशा सर्व स्तरातील समाजातील स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेणे आणि त्या कार्यातून समाजावर झालेला परिणाम अभ्यासणे आवश्यक आहे म्हणून प्रस्तुत शोध प्रबंधाचा आराखडा तयार केला आहे.

प्रकरण आराखडा

प्रकरण -१ करवीर संस्थानाचा उदय :

सन १८१८ मध्ये मराठा साम्राज्य नष्ट होऊन पुण्याच्या शनिवार वाडयावर इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. ब्रिटिश साम्राज्याची सुरुवात महाराष्ट्रात झाली. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत अनेक संस्थाने होती. करवीर संस्थान त्यापैकीच एक होते. या करवीर संस्थानाचा उदय व विस्ताराचा आढावा प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या दृष्टीने केला जाणार आहे.

प्रकरण-२ **करवीर संस्थानातील समाज परिवर्तन चळवळीचा इतिहास :**

सन १८१८ ते 1950 या काळात करवीर संस्थानामध्ये अनेक सामाजिक चळवळी उदयास आल्या. या समाजपरिवर्तन चळवळींचा इतिहास प्रस्तुत प्रकरणा मध्ये अभ्यासला जाईल.

प्रकरण- ३ करवीर संस्थानातील कर्तबगार महिला सन १८१८ ते १९५०

करवीर संस्थानामधील कर्तबगार महिलांचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल. समाज परिवर्तनातील स्त्रिया व त्यांचे योगदान, कार्यकर्तृत्व याचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल.

प्रकरण- ४ करवीर संस्थाना मधील कर्तबगार महिलांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम :

करवीर संस्थानामधील कर्तबगार महिलांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन झालेला बदल याचा अभ्यास या प्रकरणात केला जाईल. करवीर संस्थानामधील विविध क्षेत्रातील महिलांच्या कार्याचा परिणाम अभ्यासला जाईल.

प्रकरण-V निष्कर्ष :

करवीर संस्थानामधील कर्तबगार महिलांच्या कार्याचे योगदान व त्याचे परिणाम तसेच एकूणच सर्व निष्कर्ष, सूचना, समारोप प्रस्तुत प्रकरणात केला जाईल.

संदर्भ साधने :

१. प्राथमिक साधने :

समकालीन वृत्तपत्रे, दरबारी रेकॉर्ड, संस्थानकालीन कागदपत्रे इत्यादी प्राथमिक साधनांचा वापर प्रस्तावित संशोधन प्रबंधासाठी करण्यात येईल.

२. दुय्यम साधने :

१. कृ. गो. सूर्यवंशी, इंदुमती सरकार वरील लेख “राजा माणूस”.
२. गाडेकर गुणाबाई, 1992, स्मृतिगंध, मेहेर चंद्र प्रकाशन, पुणे.
३. शिर्के आनंदीबाई, दु. आ. सांजवात, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४. जोगळेकर मृणालिनी, 1991, स्त्री अस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक भाग तीन ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
५. राजस वसंत, 2014, स्त्रीयांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
६. पवार गो. मा. 2019, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, मनोविकास प्रकाशन, पुणे.
७. पवार गो.मा., शिंदे रणधीर संपा. 2016, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय, खंड दुसरा, आत्मपर लेखन विभाग दुसरा माझ्या आठवणी व अनुभव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
८. स्मृतिचित्रे जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, 12 ऑगस्ट 1949 मुंबई
९. स्मृतिचित्रे जनाक्का शिंदे, तरुण महाराष्ट्र, 21 ऑक्टोबर 1949, मुंबई
१०. शिवराम जानबा कांबळे, पार्वती मंदिर सत्याग्रह.
११. पवार जयसिंगराव, राजश्री शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ खंड 5, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.
१२. डॉ. मृदुला रामांन्ना, पीएच.डी. थेसिस, मैसूर विद्यापीठ, म्हैसूर कर्नाटक,
१३. Chhatrapaties of Kolhapur, Manohar Malgaonkar
१४. करवीर रियासत : करवीर छत्रपती घराण्याचा इतिहास, इ. स. १७१० ते इ. स. १८८३ / सदाशिव मार्तंड गर्गे. 2. आवृत्ती

१५.करवीर रियासतीचा कागदपत्रे / संपादक, सदाशिव मार्तंड गर्गे. 1. आवृत्ती
१६.Rajarshi Shahu Chhatrapati papers / edited by A.G. Pawar

परिशिष्ट

संशोधक मार्गदर्शक
डॉ.शहाजहान बशीर शेख
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
आझाद महाविद्यालय, औसा,
ता.औसा, जि.लातूर.

संशोधक
नरेंद्र नरसिंग सूर्यवंशी
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.